मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोहननगर जलतरण तलावाचे अत्याधुनिक नूतनीकरण पूर्ण

## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते लोकार्पण, नागरिक व खेळाडूंना आधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मोहननगर येथील श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण पूर्ण झाले असून या कामाचे लोकार्पण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या प्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे,शंकर जगताप यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य प्रमोद कुटे, धर्मपाल तंतरपाळे,नगरसदस्या वैशाली काळभोर, अरुणा लंगोटे यांच्यासह उपायुक्त पंकज पाटील, अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक



उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, शहरातील नागरिकांसाठी अधिकाधिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्या आधुनिक व दर्जेदार करणे हा महापालिकेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. मोहननगर जलतरण तलावाचे नूतनीकरण हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे नागरिकांना तसेच खेळाडूंना उत्कृष्ट सुविधा मिळणार आहेत.

ते पुढे म्हणाले की, हे काम केवळ दुरुस्तीचे नसून शहरातील क्रीडा क्षेत्राला बळकटी देणाऱ्या व्यापक धोरणाचा भाग आहे. या सुधारित सुविधांमुळे स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळेल आणि भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणारे खेळाडू घडण्यास मदत होईल.

जलतरण तलावाच्या नूतनीकरणासाठी सुमारे ३ कोटी ९१ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या कामात तलावाची खोली कमी करणे, तलाव आच्छादित करणे, वॉटरप्रूफिंग, नवीन फ्लोरिंग, नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांचे नूतनीकरण, अंतर्गत सुशोभीकरण, विद्युत कामे, आधुनिक फिल्टरेशन प्लँट बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच रंगरंगोटी आदी कामांचा समावेश आहे.

उपायुक्त पंकज पाटील यांनी या सर्व कामांमुळे जलतरण तलाव अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि आकर्षक बनल्याचे सांगितले. तसेच नागरिकांना आणि खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंकज पाटील यांनी केले, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार वैशाली काळभोर यांनी मानले.

> मोहननगर येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण पूर्ण झाल्याने नागरिक आणि खेळाडूंना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध होतील. शहरातील क्रीडा सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे.
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> महापालिकेकडून उभारण्यात येणाऱ्या अशा सुविधा या केवळ पायाभूत कामे नसून शहराच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठीची गुंतवणूक आहेत. या जलतरण तलावामुळे स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळेल.
> - आण्णा बनसोडे, उपाध्यक्ष, विधानसभा.

# पिंपरीसाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारण्यात यावे

## आमदार अमित गोरखे यांची राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वीज वितरण समस्यांबाबत बैठक मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाश भवन, सेनापती बापट मार्ग, पुणे येथे पार पडली. आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी शहरातील विविध समस्यांवर प्रकाश टाकला. यात प्रामुख्याने पिंपरी शहरासाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारण्यात यावे, ही मुख्य मागणी त्यांनी केली.

पिंपरी शहरातील संभाजीनगर, काळभोरनगर, विद्यानगर, दत्तनगर, इंदिरानगर, शंकरनगर, मोरवाडी, आकुर्डी, प्राधिकरण, पिंपरी गाव,



दापोडी, संत तुकाराम नगर परिसर व इतर विविध भागांमध्ये अलीकडे वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत आहेत. सदर भागांना सध्या टाटा टेल्को उपकेंद्रामार्फत वीजपुरवठा केला जात असून त्याच उपकेंद्रावरून चाकण, आनंदी, तबादले जाधववाडी, चिखली या दूरच्या भागांनाही वीजपुरवठा होत असल्याने त्या उपकेंद्रावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. यामुळे पिंपरी शहरासाठी इलेक्ट्रिकल सबस्टेशन आवश्यक आहे अशी मागणी केली, यावेळी आमदार गोरखे यांनी केली.

शहरामध्ये नागरिकांना मोठ्या प्रमाणात विजेच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित होणे, अशा प्रकारच्या अनेक समस्या आहेत. यावर तोडगा म्हणून पिंपरीसाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारणे, हा एकमेव पर्याय असल्याचे देखील आमदार अमित गोरखे यांनी स्पष्ट केले आहे.

### आमदार अमित गोरखे यांच्या प्रमुख मागण्या..

» अतिरिक्त वीज भार असलेले रोहित्रांची क्षमता वाढविणे. वीज अपघात टाळणेसाठी ट्रान्सफॉर्मर्सना FRP फेन्सिंग करणे. जुन्या कमकुवत झालेल्या एल टी व एच टी केबल बदलून नवीन टाकणे. जुने खराब झालेले एल टी फीडर पिलर (मिनी, ४ वे, ६ वे) बदलून नवीन बसविणे.एचटी व एलटी उपरी वीज लाइन भूमिगत करणे पिंपरी विधानसभेअंतर्गत विविध भागातील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी नवीन सबस्टेशनची उभारणी करणे.अपघाती क्षेत्रातील ट्रान्सफॉर्मर व डीपी स्ट्रक्चर नवीन ठिकाणी शिफ्ट करणे.

# अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिकेची धडक कारवाई सुरूच

## पाच क्षेत्रीय कार्यालयांत संयुक्त कारवाई; तीन दिवसांत 45 हजार 289 चौरस फूट अतिक्रमण हटविले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब, क, इ, ग, व फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १५ ते १७ एप्रिल २०२६ रोजी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात धडक निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४६ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आले असून सुमारे ४५ हजार २८९ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात आली.





‘ब’ क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १७ एप्रिल २०२६ रोजी प्रभाग क्र.१८ चिंचवड येथे एकूण ९ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे २१,७९८ चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

‘क’ क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरात ३ अनधिकृत पत्राशेड (१६२ चौरस फूट) तसेच प्रभाग क्र. २ पुणे-नाशिक महामार्ग, बोऱ्हाडेवाडी परिसरात ४ पत्राशेड (१,५५० चौरस फूट) यावर निष्कासन कारवाई करण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरातील ३ अनधिकृत आरसीसी बांधकामांवर कारवाई करून सुमारे २,०९९ चौरस फूट क्षेत्रफळ मोकळे करण्यात आले.

‘ई’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ०३ मौजे मोशी/डूडूळगाव येथे धडक कारवाई पथकाद्वारे १ अनधिकृत पत्राशेड बांधकामावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत अंदाजे ६५० चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

‘फ’ क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी चिखली येथील प्राईम पार्क, शेलार वस्ती परिसरात नियमबाह्य व्यावसायिक बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ३,६६० चौरस फूट क्षेत्रफळावरील ८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.

‘ग’ क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १५ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २७ मधील सिंहगड कॉलनी, सज्जनगड कॉलनी, ज्ञानदीप कॉलनी, न्यू डी.पी. रस्ता, शिवालय कॉलनी, रहाटणी येथे सुमारे ४,११२ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर तसेच नाल्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. त्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २४ व २७ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,४११ चौरस फूट क्षेत्रफळावरील ४ अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २३ व २१ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,८४६ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. तर क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, अजिंक्य येळे, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली उपअभियंते, धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक, एम. एस. एफ जवान, पोलीस कर्मचारी, महापालिका मजूर, ठेकेदार यांच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी जेसीबी ब्रेकर, ट्रॅक्टर ब्रेकर आदी उपकरणांचा वापर करण्यात आला.

महानगरपालिके कडून अशा प्रकारच्या अतिक्रमणांविरोधातील कारवाई सातत्याने सुरू राहणार असून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

### पाच क्षेत्रीय कार्यालयांत कारवाई

» ‘ब’, ‘क’, ‘ई’, ‘ग’ आणि ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चिंचवड, भोसरी, मोशी, चिखली, रहाटणी आदी भागांत ही मोहीम राबविण्यात आली. जेसीबी, ट्रॅक्टर ब्रेकर व मनुष्यबळाच्या सहाय्याने पत्राशेड, आरसीसी बांधकामे आणि नाल्यावरील अतिक्रमणे हटवली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी, पोलीस, जवान आणि मजुरांनी संयुक्तपणे ही कारवाई पूर्ण केली.

### धडक कारवाईत ४६ बांधकामे निष्कासित


» पिंपरी-चिंचवड महापालिकेने १५ ते १७ एप्रिलदरम्यान शहरातील विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात मोठी मोहीम राबवली. या कारवाईत एकूण ४६ अनधिकृत बांधकामे, पत्राशेड व अतिक्रमणे हटविण्यात आली. सुमारे ४५ हजार २८९ चौरस फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. नागरिकांची सुरक्षा, वाहतूक सुलभता आणि शहराचा नियोजनबद्ध विकास लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली. प्रशासनाने पुढील काळातही अशी मोहीम सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 99 सोसायट्यांचे एसटीपी बंद; महापालिकेचा कडक इशारा

## नळजोड तोडणे, दंड आणि फौजदारी कारवाईचा इशारा; पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर निर्णय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शंभरहून अधिक सदनिका असलेल्या हाऊसिंग सोसायट्यांना मैलासांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू करण्याबाबत महापालिकेने अनेकदा नोटिसा बजावल्या आहेत. तरीही, तब्बल 99 सोसायट्यांमधील एसटीपी बंद स्थितीत आहेत. विविध कारणे पुढे करून एसटीपी बंद ठेवला जात आहे. एसटीपी सुरू न करणाऱ्या सोसायट्यांचा नळजोड तोडण्याचा तसेच, दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूने विस्तारत असून लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वाढू लागली आहे. सध्या शहरवासीयांना 650 एमएलडी पाणी एका दिवसाला दिले जात आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील अनेक मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना खासगी टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे. वाढत्या उन्हामुळे बोरवेल व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पाण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. विस्कळीत, अपुरा, दूषित व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींचा पाऊस सारथी हेल्पलाइनवर पडत आहे. त्यातून महापालिकेने एसटीपी बंद असलेल्या सोसायट्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे.

महापालिकेने शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायटीचे सर्वेक्षण केले आहे. त्यात अनेक सोसायट्यांचे एसटीपी सुरू नसल्याचे आढळून आले आहे. एसटीपी सुरू न ठेवल्याने महापालिकेने त्या सोसायट्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रथम दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. त्यानंतर महापालिकेच्या पिण्याचा पाण्याचा नळजोड तोडला जाणार आहे. त्यानंतर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहे.

> महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून नोटिसा दिल्यानंतरही शहरातील 99 हाऊसिंग सोसायट्यांमधील एसटीपी बंद असल्याचे आढळून आले आहे. त्या सोसायटीधारकांनी तातडीने एसटीपी प्रकल्प सुरू करावेत, असे बजावण्यात आले आहे. तसे न केल्यास त्याचा नळजोड तोडला जाणार आहे. दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने नियोजन केले आहे.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

# बेकायदा 'आरएमसी' प्लांटवरची कारवाई थांबली!

## पुणे महापालिकेत नियोजित कारवाईची माहिती लीक झाल्याने बेकायदा आरएमसी प्रकल्पांवरील कारवाई तूर्तास रखडली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील लोहगाव, खांदवेनगर येथील 'रेडिमिक्स सिमेंट काँक्रिट' (आरएमसी) प्रकल्पावर कारवाई केल्यानंतर धायरी भागातील प्रकल्पावर अशीच कारवाई करून हे प्रकल्प जमीनदोस्त करण्याची तयारी महापालिकेने केली होती. मात्र, याच वेळी प्रशासनातील एक अधिकारी फुटला. त्याने कारवाई होणार असल्याची माहिती संबंधित प्रकल्पचालकाला कळविल्याने सूत्रे हलली आणि 'वरून' कारवाई थांबविण्याचे आदेश आले. मात्र, यामुळे प्रशासनात अस्वस्थता निर्माण झाली आहे. 'प्रकल्प बेकायदा असेल, तर त्यावर कारवाई होईलच,' अशी भूमिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी स्पष्ट केली.

पर्यावरणाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून प्रदूषणकारी 'आरएमसी' प्रकल्प चालविणाऱ्यांविरोधात महापालिकेने मोहीम उघडली होती. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत सूचना दिल्या होत्या. महापालिकेने गुरुवारी लोहगाव, खांदवेनगर येथील आरएमसी प्रकल्पावर कारवाई करून तो जमीनदोस्त केला.

या कारवाईनंतर वडगाव बुद्रुक, धायरी येथील बेकायदा सुरू 'आरएमसी' प्रकल्पांवर कारवाईचे नियोजन करण्यात आले. बांधकाम विभागाने याचा प्रस्ताव तयार करून अतिक्रमण निर्मूलन विभागाला दिला. शुक्रवारी (१७ एप्रिल) पहाटे ही कारवाई नियोजित होती. हा प्रस्ताव विविध अधिकाऱ्यांकडे स्वाक्षरीसाठी पाठविली जात असताना महापालिकेतील एका अधिकाऱ्याने त्याची माहिती प्रकल्प चालविणाऱ्याला दिली. त्यानंतर वरिष्ठ पातळीवरून सूत्रे हलविण्यात आली. अवघ्या काही मिनिटांमध्ये कारवाई न करण्याचे आदेश अतिक्रमण निर्मूलन विभागाला देण्यात आले.

या आदेशानंतर महापालिका प्रशासनामध्ये चांगलीच अस्वस्थता पसरली. प्रशासनाची गोपनीय माहिती संबंधित प्रकल्प चालकाला देणारा अधिकारी नक्की कोण, याचा शोध सुरू झाला असून, लवकरच हा फुटीर अधिकारी समोर येईल, असे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

अतिक्रमण निर्मुलन विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर म्हणाले, अतिक्रमण निर्मूलन विभागाने वडगाव, धायरी येथील बेकायदा आरएमसी प्रकल्पांवर कारवाईचे नियोजन केले होते. अचानकपणे कारवाई करू नये असे आदेश आले. कारवाई रद्द करण्यात आली.



### 'पिंपरी-चिंचवड आयुक्तांप्रमाणे कारवाई करा'

**» महापालिकेतील गोपनीय माहिती दिल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अतिक्रमण विभागातील अधिकाऱ्यांना आयुक्तांनी थेट निलंबित केले. आयुक्तांनी कडक पाऊल उचलून ही कारवाई केली. तशीच कारवाई या फुटीर अधिकाऱ्यावर देखील करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. आयुक्तांनी कडक भूमिका घेतल्यास इतर कोणीही गोपनीय माहिती देण्याची हिंमत दाखविणार नाही, अशी अपेक्षा अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.**

> **वडगाव-धायरी येथील आरएमसी प्लांटवर कारवाईचे नियोजन सुरू असताना मला अचानक 'कारवाई करू नये' असे आदेश प्राप्त झाले. त्यामुळे ही मोहीम रद्द करावी लागली.**
>
> **- सोमनाथ बनकर, उपायुक्त, अतिक्रमण निर्मूलन विभाग**

> **लोहगाव येथील कारवाईचे आदेश मी स्वतः दिले होते. मात्र, वडगाव-धायरी येथे कारवाई होणार होती, याची मला कल्पना नव्हती. त्यामुळे ती का थांबली, हे आताच सांगता येणार नाही. मात्र, या प्रकरणाची सखोल माहिती घेतली जाईल. जे प्लांट बेकायदा आहेत, त्यांच्यावर कारवाई निश्चितच होईल.**
>
> **- नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका**

# महापालिकेच्या 13 प्रभाग समित्या होणार बिनविरोध; दोन प्रभागात होणार निवडणूक

## प्रभाग समिती अध्यक्ष निवडीत भाजपचा डंका; एका जागी काँग्रेसचा विजय निश्चित

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या १५ प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदासाठी शुक्रवारी अर्ज दाखल करण्यात आले. १५ पैकी १३ समित्यांची निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध होणार असून, दोन प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. १३ पैकी १२ समित्यांचे अध्यक्षपद भाजपला मिळणार असून, एका समितीवर काँग्रेसचा अध्यक्ष असणार आहे.

प्रभाग समित्यांच्या रचनेत हस्तक्षेप करून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मनमानी केल्याबद्दल उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केल्यानंतर भाजपने राष्ट्रवादीला ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीचे अध्यक्षपद दिले आहे. ढोले पाटील रोड आणि येरवडा वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे.

महापालिका निवडणुकीनंतर प्रशासनाने १५ क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना केली आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या नव्या रचनेत पक्षीय बलाबलानुसार १४ क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समित्यांवर भाजपचे वर्चस्व निर्माण होणार आहे, तर काँग्रेसला एक प्रभाग समिती मिळणार होती. यामध्ये महापालिकेत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला एकही प्रभाग समिती मिळणार नव्हती.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी याची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानंतर अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने ७ एप्रिल रोजी पालिकेला दिले. पण, प्रशासनाचा अहवाल अद्याप आलेला नाही. त्यामुळे या दोन क्षेत्रीय कार्यालयाच्या निवडणुका स्थगित कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते नीलेश निकम यांनी केली.




### प्रभाग समिती अध्यक्ष

- » नगर रोड वाघोली – अनिल सातव
- » छत्रपती शिवाजीनगर घोले रोड – अमृता म्हेत्रे
- » औंध बाणेर – रोहिणी चिमटे
- » कोथरूड बावधन – वासंती जाधव
- » वारजे कर्वेनगर – मंजुश्री खर्डेकर
- » सिंहगड रोड – सचिन मोरे
- » धनकवडी कात्रज आंबेगाव – प्रतिभा चोरगे
- » कोंढवा उंड्री – रंजना टिळेकर
- » हडपसर मांजरी – प्रशांत उर्फ मामा तुपे
- » बिबवेवाडी – मनीषा चोरबेले
- » कसबा पेठ – उज्वला यादव
- » विश्रामबागवाडा – राघवेंद्र मानकर (वरील सर्व अध्यक्ष भाजप)
- » वानवडी – साहील केदारी (काँग्रेस)

# पिलाणवाडी धरणात केवळ 17% पाणी; पुरंदरमध्ये टंचाईचा धोका

## पाणीचोरीमुळे वाढला ताण; प्रशासनाचे पिण्यासाठीच साठा राखण्याचे आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील पिलाणवाडी धरणातील पाणीसाठा अत्यंत खालावला आहे. सध्या या तलावात केवळ 17 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. याबाबत गराडे पाटबंधारे शाखेचे अभियंता अविनाश जगताप यांनी माहिती दिली. एकूण 69.22 दशलक्ष घनफूट क्षमतेच्या या धरणातील साठा संपुष्टात येत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनू लागला आहे.

पिलाणवाडी जलाशयावरून शिवरी प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेद्वारे खळद, एखतपूर-मुंजवडी, वाळुंज, निळुंज आणि साकुर्डे या गावांना पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय जेजुरी येथील 400 केव्ही विद्युत वितरण कंपनीलाही याच धरणातून पाणी दिले जाते. मात्र, साठा घटल्याने या सर्व भागांतील पाणीपुरवठ्यावर थेट परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या धरणावर अवलंबून असलेल्या सुमारे 399 हेक्टर क्षेत्रातील शेतीला रब्बी व खरीप हंगामात पाणी दिले जाते. उचल पाण्याच्या परवान्याची मुदत 28 फेब्रुवारी रोजी संपल्यानंतरही काही ठिकाणी वीज पंपांच्या साहाय्याने बेकायदा पाणीउपसा सुरू असल्याचे समोर आले आहे. या पाणीचोरीमुळे उपलब्ध साठ्यावर अतिरिक्त ताण येत असून, गावांच्या पाणीपुरवठ्यात अडथळे निर्माण होत आहेत.

याबाबत महावितरण कार्यालयाला लेखी पत्र देण्यात आल्याची माहिती पाटबंधारे शाखेचे संदेशक एस. एच. कोरपड यांनी दिली. दरम्यान, पुरंदर तालुक्यातील सर्व धरणे व जलाशयांतील साठा उन्हाळ्यामुळे झपाट्याने घटत असल्याने तहसीलदार विक्रम राजपूत यांनी तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत.

उपलब्ध पाणीसाठा पुढील मान्सूनपर्यंत टिकविण्यासाठी तो केवळ पिण्याच्या वापरासाठी राखून ठेवावा तसेच शेती किंवा इतर कारणांसाठी होणारा पाणीवापर तत्काळ थांबवावा, असे आदेश देण्यात आले आहेत.प्रशासनाच्या या सूचनांनंतरही पाणीचोरी थांबली नाही, तर आगामी काळात शिवरी परिसरातील पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पाणी व्यवस्थापनाबाबत कठोर अंमलबजावणीसह सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवण्याची गरज आहे.

### शेतीला फटका बसण्याची शक्यता

» पिलाणवाडी धरणावर अवलंबून असलेल्या सुमारे ३९९ हेक्टर क्षेत्रातील शेतीला रब्बी व खरीप हंगामात पाणीपुरवठा केला जातो. मात्र साठा कमी झाल्याने शेतीसाठी पाणीपुरवठा बंद करण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने उपलब्ध पाणी फक्त पिण्यासाठी राखून ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न उभा राहिला आहे. आगामी मान्सूनपर्यंत पाणी टिकवण्यासाठी काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### धरणातील पाणीसाठा घटला

» पिलाणवाडी धरणात सध्या केवळ १७ टक्के पाणीसाठा शिल्लक असून पुरंदर तालुक्यात पाणीटंचाईचे संकट गडद झाले आहे. या जलाशयावरून खळद, एखतपूर-मुंजवडी, वाळुंज, निळुंज आणि साकुर्डे गावांना पाणीपुरवठा केला जातो. जेजुरी येथील वीज वितरण कंपनीलाही येथून पाणी दिले जाते. साठा घटल्याने सर्व भागांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने पाणी केवळ पिण्यासाठी राखून ठेवण्याचे आदेश दिले आहेत. बेकायदा पाणीउपसा थांबवण्यासाठीही उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

### पाणीचोरीवर प्रशासनाचा इशारा

» उचल पाण्याच्या परवान्याची मुदत संपल्यानंतरही काही भागांत वीज पंपांच्या साहाय्याने बेकायदा पाणीउपसा सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे उपलब्ध साठ्यावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. याबाबत संबंधित विभागाने महावितरण कार्यालयाला लेखी पत्र दिले आहे. प्रशासनाने पाणीचोरी तातडीने थांबवण्याचे निर्देश दिले असून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक थेंब जपणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पुणे विमानतळावर हवाई दलाच्या विमानाचा अपघात; धावपट्टी रात्रभर बंद

## भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाल्यामुळे पुणे विमानतळावरील धावपट्टी शुक्रवारी रात्री बंद करण्यात आली.




**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाल्यामुळे पुणे विमानतळावरील धावपट्टी शुक्रवारी (१७ एप्रिल) रात्रीच्या सुमारास बंद करण्यात आली. त्यामुळे पुणे विमानतळावरील तब्बल ९१ विमाने एकाच रात्रीत रद्द करण्यात आली. प्रवाशांनी अद्ययावत माहितीसाठी संबंधित विमान कंपन्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन विमानतळ प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, धावपट्टीवरील विमानाचा अडथळा दूर करण्यात आला असून, शनिवारी (१८ एप्रिल) सकाळी साडेसात वाजता विमानांच्या उड्डाणांना आणि साडेआठ वाजता विमाने उतरवण्यास सुरुवात करण्यात आल्याची माहिती विमानतळ प्राधिकरणाकडून देण्यात आली. तर, अपघात झालेल्या विमानातील कर्मचारी सुरक्षित असून, कोणतीही जीवितहानी किंवा नागरी मालमत्तेचे नुकसान झाले नसल्याचे हवाई दलाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

या घटनेचा सर्वाधिक फटका प्रवाशांना बसला. पुणे विमानतळाची एकमेव धावपट्टी बंद झाल्यामुळे येणारी नागरी विमाने हवेतच अडकून पडली होती. इंधनाची मर्यादा आणि सुरक्षितता लक्षात घेऊन ही विमाने गुजरातमधील सुरत, गोव्यातील मोपा, नवी मुंबई, चेन्नई आणि कोइंबतूर विमानतळाकडे वळवण्यात आली. तर, अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली. प्रवाशांचा मोठा खोळंबा झाला असून, विमानतळावर गोंधळाची स्थिती निर्माण झाली. १७ आणि १८ एप्रिल दरम्यान इंडिगोची (INDIGO) सर्वाधिक येणारी ३५ आणि जाणारी ३८ विमाने रद्द करण्यात आली. याशिवाय एअर इंडियाची (AIR INDIA) ३ येणारी आणि ३ जाणारी, स्पाइस जेटची (SPICE JET) २ येणारी आणि ३ जाणारी आकसा एअरची (AKASA AIR) २ येणारी आणि ३ जाणारी, एअर इंडिया एक्स्प्रेसची (AIR INDIA EXPRESS) ५ येणारी आणि ५ जाणारी विमाने रद्द करण्यात आली. सुमारे ९१ विमाने एकाच रात्रीत रद्द करण्यात आल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

### रात्रभर काय काय घडले?

» शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास एका लढाऊ विमानाचा धावपट्टीवर उतरताना अपघात झाला. 'अंडरकॅरेज फेल्युअर' मुळे (विमानाची चाके उघडण्यास तांत्रिक अडथळा) धावपट्टीवर विमानाचा अडथळा निर्माण झाल्याने धावपट्टीवरील कामकाज तात्पुरते थांबवण्यात आले होते. आता विमानाचा अडथळा दूर करण्यात यश आले असून, दिवसभरात विमानतळावरील वाहतूक पूर्ववत करण्यात येईल, असा दावा पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी केला.